

देगलूर : डॉ. देबडे यांना उत्कृष्ट समन्वयक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# डॉ. देबडे यांना उत्कृष्ट समन्वयक पुरस्कार

**देगलूर :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा या उपक्रमाची राज्यस्तरीय स्पर्धा २०२२-२३ अंतर्गत विविध विभागात दिले जाणारे राज्य शासनाचे पुरस्कार जाहीर झाले असून करिअर कट्टा या उपक्रमाचा उत्कृष्ट तालुका समन्वयक म्हणून प्रा. डॉ. संजय देबडे यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, जनार्दन चिद्रावार, गंगाधर जोशी, रवींद्र अप्पा द्याडे, देवेंन्द्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, प्रा. डॉ.बी.आर. कतुरवार, उपप्राचार्य एम.एम. चमकुडे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner